सन २०१९-२० करिता भारतीय संविधान २७५(१) अंतर्गत मंजूर "Establishment and operation of 15 semi-automated central kitchens" या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र.३५/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १३/०९/२०१९

संदर्भ-

१. जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants, दि.११/०३/२०१९.
२. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१९/प्र.क्र.६३/ का.१९, दिनांक २८/०६/२०१९ व दि.२३/०७/२०१९

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून दरवर्षी विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानासाठी नावीन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय,शासकीय, अशासकीय/ सामाजिक / खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करून निवडक प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्तावामध्ये स्त्री शक्ती यांचा प्रस्ताव प्राप्त झाला. सदर प्रस्ताव मुख्यत्वे ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय तळोदा,नाशिक,डहाणू,किनवट व यावल यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सेमी Automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची उभारणी करून आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक ,रुचकर व स्वादिष्ट भोजन पुरवून विद्यार्थ्यांच्या पोषणाची स्थिती सुधारणे या बाबत आहे.

२. विभागाच्या निवासी आश्रमशाळातील व वसतिगृहांमधील विदयार्थ्यांना उच्च दर्जाचा पोषणयुक्त आहार पुरवठाकरून पोषणाची स्थिती सुधारणे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने ही योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्तावित केली.जनजाती कार्य मंत्रालयाने दिनांक १२.०२.२०१९रोजी आयोजीत केलेल्या Project Appraisal Committee (PAC) बैठकीमध्ये "Stri Shakti- establishment and operation of १५ semi automated central kitchens" हि योजना सन २०१९-२० व सन २०२०-२१ करिता भारतीय संविधान अनुच्छेद २७५(१) योजने अंतर्गत स्त्री शक्ती संस्थेमार्फत राबविण्यासाठी अनुक्रमे रु. ९४५.६२ लक्ष व ९४५.६२ लक्ष असे एकूण रू.१८९१.२४ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भाधिन पत्र क्र.१ अन्वये मंजुरी दिलेली असून सदर निधी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना वितरित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्रात सद्यस्थितीत ५०२ शासकीय आश्रम शाळा व २५ एकलव्य निवासी शाळा कार्यरत आहेत. या सर्व निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आदिवासी विकास विभागाची आहे. त्यांचे आरोग्य, पोषण व शिक्षण योग्य प्रकारे व्हावे यासाठी विभागामार्फत विशेष योजना राबविल्या जातात. मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची स्थापना केली तर आदिवासी विकास विभागाच्या निवासी असणा-या आश्रमशाळातील व वसतिगृहातील विदयार्थ्यांच्या पोषणाची स्थिती सुधारुन त्यांना उच्च दर्जाचा पोषणयुक्त आहार पुरवठा करणे शक्य होणार आहे. या योजनेच्या अनुषंगाने ए .आ. वि .प्रकल्प कार्यालय तळोदा यांचे कार्यक्षेत्रात ५ , ए .आ. वि .प्रकल्प कार्यालय नाशिक व किनवट यांचे कार्यक्षेत्रात प्रत्येकी ३ व , ए .आ. वि .प्रकल्प कार्यालय डहाणू व यावल यांचे कार्यक्षेत्रात प्रत्येकी २ असे एकूण १५ सेमी Automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह उभारण्याचे नियोजित आहे .

४. स्त्री शक्ती ही एक नोंदणीकृत संस्था असून सन १९९३ सालापासून महिला सशक्तीकरणावर काम करते. सदर संस्था ही आय.एस.ओ मानांकित संस्था असून स्त्री शक्ती उपक्रमात भाग घेऊन महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्या संदर्भात कामकाज करत आहेत. सदर संस्थेद्वारे गुजरात राज्यात श्रमिक अन्नपूर्णा योजना, तसेच भारतात ४५०० पेक्षा अधिक शाळांमध्ये भोजना संदर्भात सेवा देत आहेत. याचाच एक भाग त्यांनी सन २००९ पासून दिल्ली येथील सचिवालय येथे उपहार गृह चालविण्यासाठी घेतले आहे तसेच जानेवारी २०१५ पासून दिल्ली पोलीस मुख्यालय येथे उपहारगृहाचे कामकाज करीत आहेत. सदर संस्थेला या शेत्रातील १७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. सदर संस्थेद्वारे नंदुरबार व जव्हार या प्रकल्प क्षेत्रामध्ये आदिवासी विकास विभागामार्फत मध्यवर्ती स्वयंपाक गृह चालविले जात आहे अशा नावाजलेल्या तसेच विभागाशी कामकाजाचा अनुभव असलेल्या व या क्षेत्रामध्ये कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या संस्थेमार्फत मंजूर “Stri Shakti- establishment and operation of १५ semi-automated central kitchens” हि योजना स्त्री शक्ती या संस्थेमार्फत राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय-</u>

आदिवासी विकास विभागाच्या निवासी असणा-या आश्रमशाळातील व वसतिगृहातील विदयार्थ्यांच्या पोषणाची स्थिती सुधारुन त्यांना उच्च दर्जाचा पोषणयुक्त आहार पुरवठा करून देण्याच्या कार्यक्रमार्तंगत “Stri Shakti- establishment and operation of १५ semi-automated central kitchens” ही योजना स्त्री शक्ती संस्था व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.१८९१.२४ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक-१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१८११४३४८२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.18 20:57:32 +05'30'

(संतोष जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. प्रधान सचिव,आदिवासी विकास, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक,ठाणे.
९) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा,यावल, किनवट, नाशिक व डहाणू
१०) संचालक, स्त्री शक्ती संस्था मुंबई
११) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१)- सन २०१९-२० व सन २०२०-२१

परिशिष्ट-१

(रुपये लाखात)

१.	**योजनेचे नाव**	Stri Shakti- establishment and operation of १५ semi automated central kitchens

२. योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र

क्र	ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय	सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची संख्या
१	तळोदा	५
२	नाशिक	३
३	डहाणू	२
४	यावल	२
५	किनवट	३
एकूण		**१५**

उपरोक्त लक्षांकामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

३. वित्तीय तरतूद

क्र.	वर्ष	योजना	निधी (रू.लक्ष)
१	२०१९-२०	"Stri Shakti- establishment and operation of १५ semi-automated central kitchens"	९४५.६२
२	२०२०-२१	"Stri Shakti- establishment and operation of १५ semi-automated central kitchens"	९४५.६२
एकूण			१८९१.२४

४. या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक

एकूण खर्च -रु. १८९१.२४ लक्ष

एका सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहासाठी येणारा खर्च-१२६.०० लक्ष

सन २०१९-२० करिता करण्यात येणारा एकूण खर्च-८८२.०० लक्ष

सन २०२०-२१ करिता करण्यात येणारा एकूण खर्च -१००८.०० लक्ष

मुल्यमापन व सनियंत्रण खर्च - रू.१.२४ लक्ष

एकूण खर्च- १८९१.२४ लक्ष

प्रकल्प निहाय एकूण खर्च पुढीलप्रमाणे-

अ.क्र	ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय	सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहांची संख्या	एकूण खर्च (GST सह) (रु. लक्ष)
१	तळोदा	५	६३०.००
२	डहाणू	२	२५२.००
३	नाशिक	३	३७८.००
४	यावल	२	२५२.००
५	किनवट	३	३७८.००
एकूण		**१५**	**१८९०.००**

		मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रत्येक सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या खर्चाचे तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक हे आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक यांनी अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचारविनिमय करून अंतिम करावे.
५.	**योजना राबवणारी यंत्रणा**	प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प तळोदा, किनवट,यावल,नाशिक ,डहाणू व स्त्री शक्ती संस्था
६.	**नियंत्रक अधिकारी**	आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व प्रकल्प मूल्यमापन व संनियंत्रण समिती
७	**योजनेचा उद्देश/ हेतु**	➢ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक-गृहामार्फत प्रकल्पातील आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांना पौष्टिक ,रुचकर व स्वादिष्ट भोजन पुरविणे ➢ आदिवासी विकास विभागाच्या निवासी असणाऱ्या आश्रम शाळेतील विदयार्थ्यांच्या पोषणाची स्थिती सुधारुन त्यांना उच्च दर्जाचा आहार पुरवठा करणे ➢ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहामार्फत विद्यार्थ्यांना वेळेत व दर्जेदार भोजनाचा पुरवठा करुन विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक वृद्धी करणे . ➢ विद्यार्थांना पौष्टिक स्वच्छ व ताजे, मुबलक भोजनाचा पुरवठा करणे.
८	**योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती**	१) योजनेच्या अनुषंगाने स्त्री शक्ती ही संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल. २) योजना राबविण्याबाबतचे सविस्तर अंदाजपत्रक व कालबद्ध कार्यक्रम निश्चित केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे प्रकल्प अधिकारी व योजना राबविणाऱ्या यंत्रणेची राहील. ३) योजनेच्या अनुषंगाने सन २०१९-२० करिता ७ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह तसेच सन २०२०-२१ करिता ८ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहे उभारण्यात येतील. ४) योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने २०१९- २० करिता मंजूर निधीतून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय तळोदा यांचे कार्यक्षेत्रात पाच व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय डहाणू यांचे कार्यक्षेत्रात २ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहे तसेच २०२०-२१ करिता मंजूर निधीतून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट व नाशिक यांचे कार्यक्षेत्रात प्रत्येकी तीन तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यावल यांचे कार्यक्षेत्रात २ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह उभारण्यात येईल. ५) सदर ठिकाणी एकाच वेळी कमीत कमी २०००- २५०० अथवा कार्यक्षेत्रातील निश्चित केलेल्या संख्येइतके विद्यार्थ्यांचे जेवण बनविण्याची क्षमता असलेले अद्यावत स्वयंपाक गृह उभारण्यात यावे. या परिसरात असलेल्या आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा तसेच वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहामार्फत दोन वेळेसचे भोजन व दोन वेळेचा नाश्ता पुरविण्यात यावा. ६) वरील ठिकाणी सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह उभारणे, त्या ठिकाणी संपूर्ण व्यवस्थापन करणे याबाबत पूर्णतः जबाबदारी स्त्री शक्ती या संस्थेची राहील.

		७) आवश्यकतेनुसार आश्रमशाळा,एकलव्य निवासी शाळा व वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या सुविधेशी जोडणे किंवा वगळणे या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार सबंधित प्रकल्प अधिकारी यांच्यावर राहील. त्यांनी अंमलबजावणी यंत्रणेशी विचारविनिमय करून निर्णय घ्यावा. ८) वरील सर्व ठिकाणी सेमी automated स्वयंपाक गृहांसाठी सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) अथवा किमान सहायक प्रकल्प अधिकारी दर्जाचा अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक सबंधित प्रकल्प अधिकारी यांनी करावी. ९) योजनेच्या अंमलबजावणीसाठी सबंधित संस्थेने आवश्यक असणाऱ्या साहित्याची खरेदी करताना योग्य गुणवत्तेचे व मानांकाचे साहित्य खरेदी करणे बंधनकारक आहे तसेच खरेदी केलेले साहित्य प्रकल्प क्षेत्रापर्यंत पोहचवण्याची जबाबदारी देखील अंमलबजावणी यंत्रणेची आहे. १०) सबंधित प्रकल्प अधिकारी यांनी सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहासाठी शाळेची / वस्तीगृहाची निश्चिती करताना जवळपासच्या शाळांचे क्लस्टर तयार करून मध्यवर्ती ठिकाणाहून या शाळांना भोजन पुरवठा करावे. भौगोलिक दृष्ट्या शेजारील प्रकल्प कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळा/एकलव्य निवासी शाळांना आवश्यक व सोयीचे असल्यास सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचा लाभ देण्याचा निर्णय संबंधित प्रकल्प अधिकारी घ्यावा. ११) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहामार्फत तयार झालेले जेवण सबंधित शाळेत पोहोचविण्यासाठी वाहनाची व्यवस्था स्त्री शक्ती संस्थेकडून करण्यात येईल. सदर वाहनावर GPS प्रणाली असणे बंधनकारक राहील. १२) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी स्त्री शक्ती संस्थेसोबत सविस्तर चर्चा करून अंमलबजावणीची रूपरेषा ठरवावी व सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाकगृह कार्यान्वित करण्याची पद्धत नमुद असणारा सामंजस्य करार (MOU) अंमलबजावणी यंत्रणेसोबत करावा. १३) योजनेच्या सनियंत्रणाकरिता अद्ययावत अँप अंमलबजावणी संस्थेने तयार करावे तसेच सदर अँप वेळोवेळी अद्ययावत करावे. १४) योजनेच्या अंमलबजाणीनंतर, आवश्यतेनुसार मध्यवर्ती स्वयंपाक गृहाचे संक्रमण करावयाचे झाल्यास त्याकरीता प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती स्वयंपाकगृहामधुन अन्न पुरविण्यात येत असलेल्या आश्रम शाळेतील सध्याचे कर्मचारी यांना स्त्री शक्ती संस्थेकडुन प्रशिक्षण मिळण्याच्या अनुषंगाने प्रकल्प कार्यालय यांनी नियोजन करावे. १५) सबंधित प्रकल्प अधिकारी आणि स्त्री-शक्ती संस्थेने चर्चा करून समाप्ती कलम (टर्मिनेशन क्लाज) आणि निर्गमन धोरण अंतिम करावे जेणेकरून आश्रमशाळांना होणारा अन्न पुरवठा विस्कळीत होणार नाही. योजनेचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा योजनेच्या कालावधीदरम्यान निर्गमनाआधी ३ महिन्यांची नोटीस देणे बंधनकारक राहील.

		१६) स्त्री-शक्ती संस्थेस सेमी automated स्वयंपाकगृह तयार करण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांनी २००० ते २५०० वर्ग फुट जागा व मध्यवर्ती ठिकाण निश्चित करून द्यावे. १७) सदर जागा व मध्यवर्ती ठिकाण निश्चित झाल्यानंतर स्त्री शक्ती संस्थेने प्राथमिक तपास करून तसेच प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत चर्चा करून पुढील कार्यवाही निश्चित करावी. जागेची निश्चिती झाल्यानंतर सेमी automated स्वयंपाकगृह ४ महिन्यात पूर्ण करुन कार्यान्वित करावे. १८) ज्या ठिकाणी सेमी स्वयंपाक गृह उभारण्यात येईल अशा ठिकाणी सबंधित प्रकल्प अधिकारी यांनी स्वयंपाक गृहासाठी स्वच्छ व मुबलक पाण्याची मोफ़त व्यवस्था, साठवणी साठी २०,००० लीटर क्षमतेच्या टाकीची व्यवस्था, तसेच २४ तास मोफत विजेची उपलब्धता, निस्तरण सुविधा (drainage facilities) उपलब्ध करून द्यावी . १९) जर काही तांत्रिक कारणास्तव स्वच्छ पाण्याचा तुटवडा व विजेचा पुरवठा खंडित झाल्यास संस्थेने पाणी उपलब्ध करून घ्यावे व जनरेटर व इतर माध्यमातून वीज पुरवठा सुरू ठेवावा व त्या बाबत येणा-या खर्चाचे देयक सबंधित प्रकल्प अधिकारी यांनी अदा करावे. २०) स्त्री शक्ती संस्थेकडून सेमी automated स्वयंपाकगृहाच्या माध्यमातून विद्यार्थांना सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण , संध्याकाळचा नाश्ता किंवा पेयजल व रात्रीचे जेवण वेळेवर उपलब्ध करून दिले जात आहे याची खातरजमा सबंधित मुख्याध्यापक/ अधीक्षक यांनी करावी. २१) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहात स्वच्छता ठेवणे संस्थेला बंधनकारक राहील. २२) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास प्रकल्प अधिकारी कामाठी, स्वयंपाकी यांना नियुक्त करण्याबाबत निर्णय घेतील व त्यांचे वेतन/रात्रपाळी भत्ता/प्रवास भत्ता शासनामार्फत अदा करण्यात यावा. २३) या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने होणा-या लेखापरीक्षणास सहकार्य करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. २४) योजनेच्या विविध टप्प्यांचा अहवाल छायाचित्रांसहित व योजनेच्या प्रगतीचे छायाचित्रण वेळोवेळी सबंधित संस्थेने प्रकल्प कार्यालय यांना सादर करणे बंधनकारक आहे. २५) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहासाठी आवश्यक असणारी मशिनरी/ यंत्रसामग्री यादीमध्ये आवश्यकतेनुसार काही बदल करावयाचा असल्यास सदर बदल करावयाचे अधिकार अंमलबजावणी यंत्रणेस असतील. संबंधित अंमलबजावणी यंत्रणा त्याबाबतची माहिती सबंधित प्रकल्प अधिकारी यांना सादर करतील. २६) शासन वा नियंत्रक यंत्रणेने निर्धारित केलेले मापदंड व मेनू याद्वारे भोजनाची यानुसार भोजनाची गुणवत्ता राखणे संस्थेस बंधनकारक असेल.

		२७) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे पॅकेज केलेले खाद्य पदार्थ हे ब्रँडेड असावे. खरेदी केलेल्या पाकीटावर बॅच नंबर, पॅकेजिंग तारीख , त्याची वैधता स्पष्टपणे नमूद असावी. २८) योजनेच्या अनुषंगाने मध्यवर्ती स्वयंपाक गृहातून पुरविण्यात येणा-या भोजनाचा दैनंदिन दर्जा तपासणी करण्यासाठी प्रकल्प स्तरावर नोडल अधिका-यांनी तपासणी करुन देण्यात येणा-या खाद्यपदार्थाची गुणवत्ता, भोजन बनविण्यासाठी खरेदी केलेल्या मालाची गुणवत्ता याबाबत प्रत्येक आठवड्याचा आहवाल सबंधित प्रकल्प अधिकारी यांना देतील. २९) मध्यवर्ती स्वयंपाक गृहात कर्मचारी, अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा यांच्याशिवाय इतर त्रयस्थ व्यक्तीस जाण्यास परवानगी नाही, जेणेकरून स्वयंपाक गृहाची स्वच्छता व सुरक्षा राखली जाईल. जर एखाद्या त्रयस्थ व्यक्तीस जायचे असेल तर सबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. ३०) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रम शाळा,एकलव्य निवासी शाळा व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचे नाश्ता, जेवण व अल्पोपहार याचे वेळापत्रक ठरविणे व त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राहतील. ३१) संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा आहार हा भौगोलिक परिस्थितीनुसार परिपूर्ण व आहारशास्राचे मापदंड पूर्ण करणारा असावा, तसेच आहाराचा मेनू हा परिस्थिती, उपलब्धता व आवश्यकतेनुसार प्रकल्प अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा यांनी सल्लामसलत करून अंतिम करावा. ३२) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या ठिकाणी अन्नाची गुणवत्ता तपासणी संबंधित नोडल अधिका-याने करावी. जिल्हा अन्न व औषधी यंत्राणा यांच्याकडुन अन्नाची तपासणी करुन घेण्याची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा निर्णय प्रकल्प स्तरीय समितीने घ्यावा. ३३) दोन वेळचे जेवण व दोन वेळेचा नाश्ता शाळेत पोहचल्यानंतर त्याचे विद्यार्थांना वाटप करण्याचे काम शाळा/वसतिगृहातील कर्मचारी करतील . यासाठी स्त्री-शक्ती संस्थेचा कर्मचारी शाळाच्या मुख्याध्यापक /शिक्षक /अधीक्षक यांच्या समवेत देखरेख ठेवेल जेणेकरून विद्यार्थ्यांना पुरेसे जेवण मिळाले किंवा नाही, विद्यार्थ्यांची आवड निवड तसेच अन्नाचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेता येईल. ३४) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची उभारणी पूर्ण झाल्या नंतर स्त्री शक्ती संस्थेद्वारे किमान ५ वर्ष मध्यवर्ती स्वयंपाक चालविणे बंधनकारक असेल. तथापि यामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास असेल. ३५) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील.

		३६) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.
९	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन**	सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाची उभारणी करणे व त्याचे काम सुरळीत चालू राहण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाय योजना करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे . १. आयुक्त आदिवासी विकास विभाग - अध्यक्ष २. अपर आयुक्त आदिवासी विकास नाशिक/ठाणे - सदस्य ३. उपसचिव, (आश्रमशाळा संबंधित) आ.वि.वि.,मंत्रालय - सदस्य ४. संबंधित प्रकल्प अधिकारी , ए.आ.वि. प्रकल्प - सदस्य ५. सेमी automated मध्यवर्तीस्वयंपाक गृहामधुन अन्न पुरविण्यातयेणारे संबधित शाळेचे मुख्याध्यापक/वस्तीगृहाचे गृहपाल (कोणतेही २) -सदस्य ६. प्रतिनिधी, अन्न व औषधी विभाग - आमंत्रित सदस्य ७. अध्यक्ष/ उपाध्यक्ष, स्त्री शक्ती - सदस्य ८. नामनिर्देशित प्रतिनिधी क़्वेस्ट -सदस्य ९. सबंधित सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहांचे नोडल अधिकारी- सदस्य सचिव सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रीयेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार उपरोक्त समितीस राहतील. ➢ निश्चित केलेली उदिष्टे साध्य होण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाच्या खर्चाचा तिमाही आढावा घेणे व त्या बाबत आवश्यक त्या उपाययोजना सुचविणे, या स्वयंपाकगृहांची उपयुक्तता विचारात घेऊन आदिवासी विकास विभागातील इतर प्रकल्प कार्यालयामध्ये नव्याने स्वयंपाक गृह उभारण्याबाबत निर्णय घेणे . ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर २ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमलबजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याचे निराकरण करावे. ➢ सदर संस्थेचा निर्धारित करून दिलेला कालावधी संपण्यापूर्वी प्रकल्प अधिकारी यांनी कार्यालयांतर्गत कार्यरत स्वयंपाकी व कामाठी यांची योग्य प्रकारे क्षमता बांधणी करावी जेणेकरून मध्यवर्ती स्वयंपाक गृह सदर संस्थेचा कालावधी संपल्यानंतर सुरुळीत चालू राहील.
१०	**योजनेची अंमलबजावणीचा कालावधी**	**एकूण कालावधी** - शासन निर्गमित झाल्यापासून ५ वर्ष व पुढील कालावधी संस्थेसोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारानुसार असेल.
११	**निधी वितरणाची कार्य पद्धती**	सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.

१) स्वयंपाक गृह उभारणी करण्यासाठी निधी वितरणाची कार्यपद्धती -

- सदर प्रकल्पासाठी मंजूर रक्कम शासनातर्फे आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांना वर्ग करण्यात येईल व त्यांच्या मार्फत सबंधित प्रकल्प अधिकारी यांना वर्ग करण्यात यावा.
- जागेची उपलब्धता व स्थाननिश्चिती झाल्यानंतर संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी स्त्री शक्तीस कार्यारंभ आदेश द्यावा. शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या इमारतीमध्ये स्वयंपाक गृहाकरीता अंतर्गत बांधकामासाठी आवश्यक असलेला निधी प्रकल्प अधिकारी यांनी, अंमलबजावणी यंत्रणेस खालीलप्रणाणे उपलब्ध करून द्यावा.
  - कार्यारंभ आदेश देताना अंतर्गत बांधकामाकरीता मंजुर असलेल्या निधीच्या ५० टक्के.
  - अंतर्गत बांधकामाच्या अनुषंगाने पाया व भिंतींचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ४० टक्के.
  - संपुर्ण अंतर्गत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तसेच आयुक्त आदिवासी विकास यांनी गठीत केलेल्या समितीच्या तपासणीनंतर उर्वरित १० टक्के.
- मध्यवर्ती स्वयंपाक गृहासाठी एका वेळेसाठी आवश्यक असलेल्या सामग्री(One time Capital) जसे कि मोठ्या मशिनरी , वस्तू यांची खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेला निधी प्रकल्प अधिकारी यांनी, अंमलबजावणी यंत्रणेस खालीलप्रणाणे उपलब्ध करून द्यावा.
  - सामग्री खरेदी करण्याच्या सुरुवातीला एकूण निधीपैकी ५० टक्के,
  - सामग्रीची निर्मिती झाल्यावर संस्थेचे पत्र व उत्पादकाचे चलन, संस्थेने सादर केल्यानंतर एकुण निधीच्या ४० टक्के.
  - खरेदी करण्यात आलेल्या सामग्री कार्यान्वित झाल्यानंतर व आयुक्त आदिवासी विकास यांनी गठीत केलेल्या समितीच्या तपासणीनंतर उर्वरित १० टक्के.

  सदर सामग्रीची खरेदी करताना सामग्री उच्च गुणवत्तापूर्ण व चांगल्या दर्जाची असणे संस्थेला बंधनकारक आहे.
- सदर स्वयंपाक गृह उभारण्याकरिता येणारा प्राथमिक खर्च जसे कि अद्यावत साधन सामुग्री, फर्निचर , व कच्चा माल खरेदी करिता येणारा संपूर्ण खर्चाचा अहवाल संस्थेने सबंधित प्रकल्प अधिकारी यांना सादर करावा.

२) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह कार्यान्वित झाल्या नंतर वितरीत करण्यात येणाऱ्या निधीची कार्य पद्धती -

- योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने आश्रमशाळा,एकलव्य निवासी शाळा व वसतिगृहातील विद्यार्थांच्या २ वेळेसच्या जेवणासाठी व २ वेळेच्या नाश्त्यासाठी प्रती विद्यार्थी रुपये २७५०/- प्रती महिना तसेच १ वेळेसचे जेवण व नाश्ता यासाठी १४००/- प्रती विद्यार्थी प्रती महिना (GST वगळून) याप्रमाणे रक्कम सबंधित संस्थेला सबंधित प्रकल्प अधिकारी यांनी अदा करावी. सदर रकमेत कपात/वाढ करण्याबाबत मुल्यमापन व सनियंत्रण समितीने वेळोवेळी आढावा घेऊन शासनास शिफारस करावी.

- संबंधित आहरण सवितरण अधिकारी यांनी सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह याकरिता अदा करावयाची तीन महिन्याची आगाऊ रक्कम आश्रमशाळा समूह योजना, लेखाशीर्ष २२२५ डी-७३४-३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत प्राप्त तरतुदीतून आहरीत करून संस्थेस अदा करावी.
- स्वयंपाक गृहासाठी वीजेसाठी होणारा खर्च आश्रमशाळा समूह योजना, लेखाशीर्ष २२२५ डी. ७३४-(०६) अंतर्गत प्राप्त निधीमधून खर्च भागविण्यात यावा. तसेच स्वयंपाकगृहासाठी पाण्यावर होणारा खर्च आश्रमशाळा समूह योजना, लेखाशीर्ष २२२५ डी. ७३४-(१४) अंतर्गत प्राप्त निधीमधून खर्च भागविण्यात यावा.
- सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाचे देयक व आगाऊ रक्कम अदा करण्याचे संपूर्ण अधिकार आदिवासी विकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक केंद्रीय २०१८/प्र. क्र.८५/ का.१९ दिनांक २३.०७.२०१९ अन्वये संबंधित प्रकल्प अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.
- एका सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून एक किंवा अधिक प्रकल्पातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यात येत असल्यास ज्या प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मध्यवर्ती स्वयंपाक गृह आहे ते प्रकल्प अधिकारी देयक अदायगीस सक्षम प्राधिकारी असतील. त्यांच्या प्रकल्पाव्यतिरिक्तच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे वरील स्वयंपाक गृहाचे देयक अदायकीसाठी आवश्यक निधी सबंधित अप्पर आयुक्त (नाशिक व ठाणे) यांनी सक्षम प्राधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात यावा.यामध्ये विलंब होणार नाही याबाबत सर्व पातळ्यांवर दक्षता घेण्यात यावी.
- योजनेची अंमलबजावणी व आढाव्यासाठी प्रकल्पस्तरावर समिती चे गठन करण्यात येत आहे.या समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

१) संबंधित प्रकल्प अधिकारी	- अध्यक्ष
२) सहाय्यक लेखाधिकारी	- सदस्य
३. संबधित सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहाचे नोडल अधिकारी	- सदस्य
४. सेमी automated मध्यवर्तीस्वयंपाक गृहामधुन अन्न पुरविण्यातयेणारे संबधित शाळेचे मुख्याध्यापक/वस्तीगृहाचे गृहपाल (कोणतेही २)	- सदस्य
५) सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृह कार्यरत असलेल्या ठिकाणचे अधिक्षक	- सदस्य
६) प्रतिनिधी,स्त्री शक्ती संस्था	-सदस्य
७) निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन (गरज पडल्यास)	- विशेष आमंत्रित
८) जेथे सेमी मध्यवर्ती स्वयंपाकगृह कार्यरत असलेल्या शाळेचे मुख्याध्यापक	- सदस्य सचिव

		➢ स्त्री शक्ती सेवा पुरवणारी संस्था असून सदर सेवा अबाधित रित्या पुरविण्याकरिता संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी मागील शैक्षणिक वर्षातील पटावरील संख्या लक्षात घेऊन त्याप्रमाणात प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस स्त्री शक्ती संस्थेच्या खात्यावर तीन महिने देयकांची अग्रीम राशी जमा करावी. अग्रीम रक्कम जमा केल्याच्या दिनांकापासुन एक महिना पुर्ण झाल्यावर व त्यानंतर प्रत्येक महिन्याला मागील महिन्यातील प्रत्यक्ष खर्चाची रक्कम स्त्री शक्ती संस्थेच्या खात्यावर प्रकल्प अधिकारी यांनी जमा करावी जेणेकरुन निधीअभावी भोजन पुरवठ्यामध्ये खंड पडणार नाही. ➢ दर पंधरवड्याचा अहवाल स्त्री शक्ती संस्थेने संबंधित प्रकल्प अधिकारी यांना सादर करावा. यानुषंगाने आवश्यक कागदपत्रांची तपासणी करुन प्रकल्प अधिकारी यांनी एक आठवड्याच्या कालावधीत बिलाची रक्कम स्त्री शक्ती संस्थेला वितरीत करावी. ➢ संस्थेने सादर केलेल्या अहवालामध्ये तफ़ावत आढळल्यास त्या महिन्याची मागणी केलेली रक्कम संस्थेस अदा करुन पडताळणीअंती उर्वरित निधीचे समायोजन पुढील महिन्यामध्ये करण्यात यावे. ➢ मुख्याध्यापक/गृहपाल यांचेकडून उपस्थिती व इतर माहिती विहीत कालावधीत सादर करण्यास विलंब होणार नाही याची दक्षता प्रकल्प अधिकारी यांनी घ्यावी
१२	**योजनेची फलनिष्पत्ती**	➢ सेमी automated मध्यवर्ती स्वयंपाक गृहामार्फत प्रकल्पातील आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांना पौष्टिक ,रुचकर व स्वादिष्ट भोजन मिळेल. ➢ आदिवासी विकास विभागाच्या निवासी असणाऱ्या आश्रम शाळेतील विदयार्थ्यांच्या पोषणाची स्थिती सुधारुन त्यांना उच्च दर्जाचा आहार पुरवठा करण्यात येईल.